म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य व्याकरण
सं. क्र. ३-२८

३८
संक्र. २८

# वृत्तदर्पण.

(भा. ०थी.)

ublic Instruction, Bombay.

मुंबई इलाख्यांत

# RÂṬHÎ VṚITTADARPAṆA,

OR

# MIRROR OF PROSODY.

BY

PARAS'URÂMA BALLÂḶA GÔḌABOLÉ.

REVISED

BY

THE VICE PRINCIPAL
TRAINING COLLEGE, POONA.

---

**Twelfth Edition.** 10,000 Copies.

---

*Registered for Copy-right under the Government of India's Act XXV of* 1867.

Bombay:
GOVERNMENT CENTRAL BOOK DEPÔT.

1894.

[ALL RIGHTS RESERVED.]

*Price 2 Annas.*

BOMBAY:

Printed at Jâvajî Dádâjî's "Nirṇaya-sâgara" Press

मुंबई इलाख्यांतील सरकारी विद्याशाळाखातें.

# वृत्तदर्पण.

हें

## परशुराम बल्लाळ गोडबोले

ह्यांनीं केलें, तें

पुणें एथील

## ट्रेनिंग कालेजचे व्हाइस प्रिन्सिपाल

ह्यांनीं शोधिलें.

आवृत्ति बारावी—१०,००० प्रती.

ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदिली आहे.

मुंबई:

गवर्नमेंट सेंट्रल बुक डीपो.

इसवी सन १८९४.

ह्या पुस्तकासंबंधीं सर्व अधिकार सरकारानें आपल्याकडे ठेविले आहेत.

किंमत २ आणे.

मुंबईंत,
जावजी दादाजी
यांच्या "निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

सं.भा. ९०

# प्रस्तावना.

कवितेचा ह्मणजे पद्यरूप रचनेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांस, तिच्या छंदांचे जे प्रकार आहेत, त्या प्रकारांचें व त्यांच्या भेदांचें ज्ञान अवश्य असलें पाहिजे. त्यांचें ज्ञान नसलें तर प्राचीन कवींच्या व अर्वाचीन कवींच्या कविता पाहण्यास किंवा नवीन कविता करण्यास मोठी अडचण पडते.

कवितेचे प्रकार संस्कृत भाषेंत विद्वानांनीं लिहून ठेविले आहेत; परंतु संस्कृत भाषा शिकल्यावांचून ते समजावयाचे नाहींत. तेच प्रकार प्राकृत कवींनीं आपल्या कवितेंत घेतले आहेत; तरी संस्कृत ग्रंथांत जितके प्रकार सांगितले आहेत तितके त्यांनीं घेतले नाहींत, असें त्यांचे ग्रंथ पाहिल्यावरून समजतें.

ह्या विषयावर प्राकृत भाषेंत झालेला ग्रंथ प्रसिद्धींत आला नाहीं. तो अवश्य असावा असें मनांत आणून विद्यार्थ्यांस वृत्तांची साधारण माहिती थोडक्यांत होण्याकरितां संस्कृत ग्रंथांच्या आधारानेंच हा लहानसा पद्यात्मक प्राकृत ग्रंथ केला आहे. ह्यांत संस्कृतांतल्याप्रमाणें वृत्तांचे सर्व प्रकार घेतले नाहींत. प्राचीन कवींचे बहुतेक पद्यात्मक ग्रंथ पाहून त्यांत वृत्तांचे व छंदांचे जे जे भिन्न भिन्न प्रकार आढळले त्यांचा मात्र एथें संग्रह केला आहे.

ह्या लहानशा ग्रंथाचा जे कोणी लक्ष लावून अभ्यास करितील त्यांस वृत्तांविषयीं बरीच माहितगारी होईल. किंबहुना पद्यरूप नवी कविता शुद्ध रीतीनें करण्याची शक्ति येईल.

हा ग्रंथ निर्दोष असेल असें ह्मणवत नाहीं; कोठें कोठें दोष राहिले असतील; तथापि नवीन कृतीकडे लक्ष देऊन सज्जन क्षमा करितील असा भरंवसा आहे.

**आर्या.**

कविता असो कशी, तरि तात्पर्यावरिच सज्जनीं दृष्टी ॥
द्यावी, तेणें होवो बालेक्षें जेंवि तन्मनस्तुष्टी ॥ १ ॥

**परशुराम बल्लाळ गोडबोले.**

---

## चालू आवृत्तीची प्रस्तावना.

या आवृत्तींत **वियोगिनी** छंदाचें लक्षण नवीन तयार करून पृ० ३४ च्या टिपेंत दाखल केलें आहे. मुद्याचे शब्द जाड अक्षरांत घातले आहेत. प्रकरणें वेगवेगळीं दाखविण्याकरितां प्रत्येक प्रकरणाच्या शेवटीं रेघा दिल्या आहेत. व छंदांचीं लक्षणें स्पष्ट होण्याकरितां गणांचीं अक्षरें सर्व पुस्तकभर जाड अक्षरांत घातलीं आहेत. आठ अक्षरी, नऊ अक्षरी, दहा अक्षरी इत्यादि छंद वेगळे दाखविण्याकरितां प्रत्येकाच्या शेवटीं रेघा मारल्या आहेत. अलीकडे ग्रंथ पुष्कळ होत आहेत परंतु त्यांतील कमीज्यास्तीपणाकडे लक्ष कोणाचेंच पोहोंचत नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे. अलीकडे प्राकृत कवितेंत वियोगिनी छंदाशिवाय बरेच छंद येऊं लागले असावे असा आमचा तर्क आहे, तरी ते कोणकोणचे व त्यांचीं लक्षणें काय तीं उदाहरणांसहित आमच्याकडे पाठविल्यास पुढील आवृत्तींत त्याविषयीं विचार अवश्य केला जाईल.

पुणें ट्रेनिंग कालेज.
तारीख १७ माहे जुलै
सन १८९४ इसवी.

**ना० बा० गोडबोले,**
व्हाइस प्रिन्सिपाल.

# उपोद्घात.

## श्लोक.

नमूनि देवदेवातें रसिक[1]स्वांततर्पण ॥
बालबोधार्थ करितों अल्प हें[2] वृत्तदर्पण ॥ १ ॥
छंदें वृत्तें संस्कृतांत वर्णिलीं असती मुळीं ॥
पाहून त्याच रीतीनें देश[3]भाषेंत सांगतों ॥ २ ॥

काव्य **दोन** प्रकारचें आहे; एक **गद्यरूप** आणि एक **पद्यरूप**. ज्याला पाद नाहींत तें **गद्य**, आणि ज्याला पाद आहेत तें **पद्य**. पद्याच्या अ[4]क्षरनियमाला व मात्रानियमाला **छंद** किंवा **वृत्त** असें ह्मणतात. छंदाविषयीं संस्कृत भाषेंत पिंगलादिकांनीं नियम सांगितले आहेत, ते प्राकृत जनांस समजण्याकरितां त्याच नियमांच्या आधारानें त्यांचीं ल[5]क्ष्यलक्षणें महाराष्ट्र भाषेंत पद्यरूपानें सांगतों.

## गीति.

छंदःशास्त्रीं जितकीं छंदें वृत्तें सुवर्णिलीं असती ॥
तितकीं प्राकृतभाषेमध्यें कोणींहि घेतलीं नसती ॥ ३ ॥
प्राकृत कविंनीं जीं जीं वृत्तें पाहोन घेतलीं गोडीं ॥
तीं तींच वर्णितों मी येतिल बहुतेक, राहतिल थोडीं ॥ ४ ॥

संस्कृत भाषेंत छंदांचे प्रकार बहुत आहेत; ह्मणजे एक अक्षराचा पाद, दोन अक्षरांचा पाद, तीन अक्षरांचा पाद, असे चढत चढत सव्वीस अक्षरांच्या पादापर्यंत छंद सांगितले आहेत. परंतु प्राकृत भाषेंत तितके प्रकार प्रसिद्ध नाहींत.

एका अक्षरापासून सात अक्षरांपर्यंत चरणाचे छंद एथें घेतले नाहींत, आठ अक्षरांच्या चरणापासून तेवीस अक्षरांच्या चरणापर्यंत मात्र छंद एथें घेतले आहेत.

## गीति.

मात्राक्षरसं[6]घाच्या बोलति रचनेसि **वृत्त** [7]कीं **छंद** ॥
मात्राक्षरगणभेदीं होती त्यांचे अनेक ते भेद ॥ ५ ॥

---

१ रसिक जनांच्या हृदयास तृप्त करणारें. २ संस्कृतांत 'दर्पण' हा शब्द पुल्लिंग त एथें नपुंसक केला आहे. ३ महाराष्ट्र भाषेंत. ४ केवळ स्वर किंवा जन स्वर. ५ उदाहरणें व लक्षणें. ६ गण. ७ किंवा.

चरणांचीं अक्षरें सारखीं असून गणभेदांनीं वृत्तभेद पुष्कळ होतात. त्यांतून प्रसिद्ध वृत्तें मात्र एथें घेतलीं आहेत.

---

## परिभाषा.

गण **दोन** प्रकारचे आहेत; **अक्षरगण** आणि **मात्रागण**. अक्षरगण **आठ** आहेत, आणि मात्रागण **पांच** आहेत.

## अक्षरगण.

### दिंडी.

गणामध्यें अक्षरें तीन येती ॥ ऱ्हस्वदीर्घांनीं आठ भेद होती ॥
**य र त न भ ज स म** हि अशीं आठ नांवें ॥ रूप त्यांचें सांगतों आयकावें ॥६॥

## अक्षरगणलक्षण.

### अभंग.

आद्यलघू जो तो **यगण** ह्मणावा ॥
**रगण** गणावा मध्यलघू ॥ ७ ॥
अंत्यलघू जो तो **तगण** ह्मणावा ॥
**नगण** गणावा सर्वलघू ॥ ८ ॥
आद्यगुरू जो तो **भगण** ह्मणावा ॥
**जगण** गणावा मध्यगुरू ॥ ९ ॥
अंत्यगुरू जो तो **सगण** ह्मणावा ॥
**मगण** गणावा सर्वगुरू ॥ १० ॥

### उदाहरण, श्लोक ( अनुष्टुप् ).

**य** यमाचा **न** नमन **त** ताराप **र** राधिका ॥
**म** मानावा **स** समरा **ज** जनास **भ** भास्कर ॥ ११ ॥

ह्या श्लोकांत छंदोनुरोधानें गणांचा क्रम साधला नाहीं ह्मणून खालीं क्रमानें गण लिहितों.

यमाचा, हा **यगण**; आद्यलघु ॥
राधिका, हा **रगण**; मध्यलघु ॥

---

१ तीन अक्षरांचा किंवा चार मात्रांचा जो समुदाय त्यास **गण**, असें णतात. २ ज्याचें पहिलें अक्षर ऱ्हस्व आहे असा. ह्याप्रमाणेंच 'मध्यलघु' इ० त्या त्या गणांचीं विशेषणें आहेत असें समजावें. ३ ज्याचें पहिलें अक्षर दीर्घ आहे अ

ताराप, हा तगण; **अंत्यलघु** ॥
नमन, हा नगण; **सर्वलघु** ॥
भास्कर, हा भगण; **आद्यगुरु** ॥
जनास, हा जगण; **मध्यगुरु** ॥
समरा, हा सगण; **अंत्यगुरु** ॥
मानावा, हा मगण; **सर्वगुरु** ॥

[library stamp]

## लघुगुरुसंज्ञा.

### श्लोक.

ऱ्हस्व स्वरातें लघु बोलताती ॥
दीर्घ स्वरातें गुरु नाम देती ॥
पुंढें अनुस्वार विसर्ग येतो ॥
संयोग ऱ्हस्वास गुरुत्व देतो ॥ १२ ॥

हा नियम प्रायः संस्कृत शब्दांस लागू आहे. जसें—कंक, दुःख, पर्व, पत्र, इत्यादि. ह्यांतील पहिलीं ऱ्हस्व अक्षरें गुरु होतात; परंतु प्राकृत शब्दांत तसें नियमानें होत नाहीं. जसें—जंव, तंव, तुझ्या, तिच्या, दुसऱ्या, इत्यादि. ह्यांतील मागल्या ऱ्हस्वाक्षराला गुरुत्व येत नाहीं. दोन समान व्यंजनें पुढें असलीं तर मात्र मागील ऱ्हस्वास नियमानें गुरुत्व येतें. जसें—कित्ता, थट्टा, गप्पा, हुद्दा, इत्यादि. ह्याचें बीज असें आहे कीं, मागील ऱ्हस्वाक्षरावर जेव्हां पुढील संयुक्ताक्षराच्या योगानें उच्चारणांत आघात येतो तेव्हां त्यास गुरुत्व येतें, एरवीं येत नाहीं. प्राकृतांत 'तुझी' ह्या शब्दाचे दोन उच्चार आहेत, ह्मणजे एक 'तु' वर आघात देऊन आहे आणि दुसरा त्याशिवाय आहे. जेव्हां आघात असतो तेव्हां 'तु' ह्या ऱ्हस्वाक्षराला गुरुत्व येतें, आघात नसतो तेव्हां येत नाहीं. तात्पर्य कीं, संयुक्ताक्षराच्या योगानें मागील ऱ्हस्वाक्षराला गुरुत्व येणें हें त्याच्या आघातावर आहे. प्राकृत शब्दांत कित्येक ठिकाणीं आघात येतो आणि कित्येक ठिकाणीं येत नाहीं, ह्मणून गुरुत्व निश्चित नाहीं. संस्कृत शब्दांत आघात नेहमीं येतो ह्यामुळें गुरुत्व नेहमीं येतें; फारच क्वचित् आघात येत नसेल.

---

१ ऱ्हस्व स्वरापुढें जेव्हां अनुस्वार, विसर्ग, किंवा संयोग येतो तेव्हां त्या ऱ्हस्व स्वरास गुरुत्व देतो असा अर्थ; क्वचित् पादांतीं ऱ्हस्वास गुरुत्व येतें. २ मध्यें स्वर न आणितां जोडलेल्या अनेक व्यंजनांस **संयोग** अथवा **जोडाक्षर** असें ह्मणतात.

## मात्रालक्षण.

**मात्रा** ह्मणजे स्वराचे उच्चारास जो काल लागतो तो.

### श्लोक (अनुष्टुप्).

लघूची तो एक मात्रा गुरूच्या दोन मानिती ॥
मात्रावृत्तीं याच रीती मात्रांनीं गण मोजिती ॥ १३ ॥

लघु अक्षराचें चिन्ह ⏑ असें आहे; आणि गुरु अक्षराचें चिन्ह— असें आहे.

## मात्रागण.

### आर्या.

गण एक एक होतो मात्रांचा चार चार मात्रांनीं ॥
लघुगुरुभेदांनीं ते मात्रांचे पांच गण होती ॥ १४ ॥

## मात्रागणलक्षण.

### आर्या.

द्वि[1]गुरु **मगण**, लेल[2]ग[3] **सगण**, लगल **जगण**, गलल, **भगण**, मनिं आणा ॥
चार हि लघु तोचि **नगण**, ऐसे हे पांच गण जाणा ॥ १५ ॥

## उदाहरणें.

मेधा, हा **मगण**; ह्यांत दोन गुरु आहेत.
सविता, हा **सगण**; ह्यांत दोन लघु एक गुरु.
जनास, हा **जगण**; ह्यांत लघु, गुरु, लघु.
भाजन, हा **भगण**; ह्यांत गुरु, लघु, लघु.
नवरस, हा **नगण**; ह्यांत चारहि लघु आहेत.

चार मात्रांचा गण भरावयास ह्या पांचांवांचून कोणताहि गण येत नाहीं.

---

## अक्षरगणवृत्तें.

अक्षरगणवृत्तांचे तीन भेद करितात. **समवृत्त**, **अर्धसमवृत्त**, आणि **विषमवृत्त**. वृत्ताला प्रायः चार भाग असतात. प्रत्येक भागाला **चरण** किंवा **पाद** ह्मणतात. ज्या वृत्ताचे चाऱ्ही चरण सारखे असतात तें

---

१ दोन. २ लघु. ३ गुरु.

सं. भा. १०



**समवृत्त,** ज्याचे प्रथम, तृतीय चरण आणि द्वितीय, चतुर्थ चरण सारखे असतात तें **अर्धसमवृत्त,** आणि ज्याचे चाऱ्ही चरण भिन्न भिन्न लक्षणांचे असतात तें **विषमवृत्त.** प्राकृत भाषेंत विषमवृत्त प्रायः कोठें आढळत नाहीं. अर्धसमवृत्तें तरी कचितच आहेत. समवृत्तें मात्र फार आहेत.

**श्लोक ( अनुष्टुप् ).**

वृत्ताचा जो चतुर्थांश तयाला **पाद** बोलिजे ॥
पादाच्या लक्षणें सर्व-वृत्त-लक्षण जाणिजे ॥ १६ ॥

वृत्तें पुष्कळ आहेत. त्यांत कोणतें वृत्त कोणत्या रसाला अनुकूळ, व कोणतें वृत्त कोणत्या रसाला प्रतिकूळ ह्याविषयींहि नियम आहेत; परंतु त्यांचा विचार एथें केला नाहीं.

---

## ह्या ग्रंथांतील विशेष संकेत.

**श्लोक ( अनुष्टुप् ).**

पादार्थी पदही कोठें गणार्थी **संघ** घेतला ॥
अक्षरार्थी **अवयव ल**ला लघु **ग**गा गुरु ॥ १७ ॥
अक्षरें गणसंज्ञेचीं जरी आहेत ऱ्हस्व तीं ॥
छंदाच्या अनुरोधानें कोठें दीर्घहि घातलीं ॥ १८ ॥

**गीति.**

ज्या वृत्ताचें लक्षण तें त्या वृत्तींच कथिन मी स्पष्ट ॥
यास्तव होइल कोठें क्लिष्ट परी साहतील तें शिष्ट ॥ १९ ॥

**श्लोक ( अनुष्टुप् ).**

वृत्तसंज्ञा आद्यपादीं द्वितीयांत गणक्रम ॥
अक्षरें तिसऱ्या पादीं उदाहरण शेवटीं ॥ २० ॥

एथें लक्षणश्लोकाचा चतुर्थ चरण जरी उदाहरणार्थ आहे, तरी लक्षण पूर्णपणें समजण्यासाठीं प्रत्येक वृत्तास अन्य ग्रंथांतील एकेक

---

१ पद ह्मणजे पाद, संघ ह्मणजे गण, अवयव ह्मणजे अक्षरें, ल किंवा ला ह्मणजे लघु, आणि ग किंवा गा ह्मणजे गुरु असें समजावें.

२ य र त न भ ज स म हीं गणसंज्ञेचीं अक्षरें कोठें कोठें या, रा, ता, ना, भा, जा, सा, मा अशींहि घातलीं आहेत.

३ हा नियम तरी समवृत्तांविषयीं मात्र साधेल.

आणखी उदाहरण दिलें आहे. क्वचित् अन्य कवीचें उदाहरण न मिळालें तेथें स्वकृत उदाहरण दिलें आहे.

वृत्तामध्यें यति ह्मणजे **अवसान** कोणत्या अक्षरावर असावें हें समजण्याकरितां त्या त्या वृत्ताच्या नांवापुढें अंक घातले आहेत आणि ज्याला पादांतीं यति आहे त्यापुढें **य० पा०** असें घातलें आहे.

ह्या ग्रंथांत पुढें जीं वृत्तें सांगावयाचीं आहेत त्यांचीं नांवें अनुक्रमानें सांगतों.

---

| वृत्तांचीं नांवें. | पादाक्षरें. |
|---|---|
| **समवृत्तें.** | |
| १ विद्युन्माला | ८ |
| २ माणवक | ८ |
| ३ प्रमाणिका | ८ |
| ४ समानिका | ८ |
| ५ अनुष्टुप् | ८ |
| ६ मणिबंध | ९ |
| ७ चंपकमाला | १० |
| ८ हंसी | १० |
| ९ मत्ता | १० |
| १० कामदा | १० |
| ११ शुद्धकामदा | ११ |
| १२ ललित | ११ |
| १३ इंद्रवज्रा | ११ |
| १४ उपेंद्रवज्रा | ११ |
| १५ उपजाति | ११ |
| १६ शालिनी | ११ |
| १७ दोधक | ११ |
| १८ रथोद्धता | ११ |
| १९ स्वागता | ११ |
| २० मौक्तिकमाला | ११ |
| २१ भ्रमरविलसित | ११ |
| २२ भद्रिका | ११ |
| २३ भुजंगप्रयात | १२ |
| २४ द्रुतविलंबित | १२ |
| २५ प्रियंवदा | १२ |
| २६ वंशस्थ | १२ |
| २७ इंद्रवंशा | १२ |
| २८ तोटक | १२ |
| २९ जलोद्धतगति | १२ |
| ३० स्रग्विणी | १२ |
| ३१ प्रमिताक्षरा | १२ |
| ३२ वैश्वदेवी | १२ |
| ३३ मालती | १२ |
| ३४ यूथिका | १२ |
| ३५ प्रभावती | १३ |
| ३६ मंजुभाषिणी | १३ |
| ३७ प्रहर्षिणी | १३ |
| ३८ मत्तमयूरी | १३ |
| ३९ विभावरी | १३ |
| ४० वसंततिलका | १४ |
| ४१ प्रहरणकलिता | १४ |
| ४२ असंबाधा | १४ |
| ४३ मध्यक्षामा | १४ |

| वृत्तांचीं नांवें. | पादाक्षरें. | वृत्तांचीं नांवें. |
|---|---|---|
| ४४ मालिनी | १५ | **अर्धसमवृत्तें.** |
| ४५ चामर | १५ | ६० हरिणीप्लुता. |
| ४६ पंचचामर | १६ | ६१ माल्यभारा. |
| ४७ शिखरिणी | १७ | ६२ पुष्पिताग्रा. |
| ४८ पृथ्वी | १७ | **मात्रागणवृत्तें.** |
| ४९ हरिणी | १७ | ६३ आर्या. |
| ५० मंदाक्रांता | १७ | ६४ गीति. |
| ५१ विबुधप्रिया | १८ | ६५ उपगीति. |
| ५२ शार्दूलविक्रीडित | १९ | ६६ उद्गीति. |
| ५३ स्रग्धरा | २१ | ६७ आर्यागीति. |
| ५४ अमृतध्वनि | २२ | **प्राकृतवृत्तें.** |
| ५५ मंदारमाला | २२ | ६८ अभंग. |
| ५६ उमा | २२ | ६९ दिंडी. |
| ५७ मदिरा | २३ | ७० साकी. |
| ५८ मदिरा किंवा सवाई | २३ | ७१ ओंवी. |
| ५९ दुसरी सवाई | २३ | ७२ घनाक्षरी. |


## समवृत्तें.

### १ विद्युन्माला—यति. ४, ४.

विद्युन्माला ऐसें बोला ॥ जेथें मा मा गा गा आला ॥
आठांनीं या पादें व्हावें ॥ श्रीरामातें भावें ध्यावें ॥

चरणांत अक्षरें ८.—गण—म, म, ग, ग.

### उदाहरण. बाहेरचें.

दीनप्रेमा ये तूं रामा ॥ सौख्यारामा[1] हृद्विश्रामा[2] ॥
अंतःसद्मा[3] नष्टच्छद्मा[4] ॥ संपद्धामा[5] दे मत्कामा[6] ॥

१ सौख्य + आराम (बाग) सौख्याचा केवळ बागच अशा. २ हृत् + विश्राम (विसांवा), मनाच्या विसांव्या. ३ अंतःकरण आहे सद्म (रहाण्याचें ठिकाण) ज्याचें ह्मणजे अंतःकरणांत नेहमीं वास करणाऱ्या. ४ कपटरहित अशा. ५ संपत्तीचें केवळ घरच अशा. ६ माझ्या इच्छेला.

### २ माणवक—य० पा०.

माणवक स्पष्ट ह्मणा ॥ भा त ल गा हेच गणा ॥
अक्षरकें अष्टमितें ॥ बाॅलॅकॅ तें दुॅग्धॅ पिॅतें" ॥

चरणांत अक्षरें ८–गण—भ, त, ल, ग.

### उदाहरण. बाहेरचें.

नित्य नव्हे त्याकरितां ॥ कां झटतां कां श्रमतां ॥
जा भगवन्नाम वदा ॥ निर्भय गा त्यास सदा ॥

### ३ प्रमाणिका—य० पा०.

प्रमाणिका तिला ह्मणा ॥ ज रा ल गा असें गणा ॥
पदांत आठ अक्षरें ॥ वॅदाॅलॅ सॅत्यॅ तें बॅरें" ॥

चरणांत अक्षरें ८–गण—ज, र, ल, ग.

### उदाहरण. बा०.

अशाश्वतासि वंदितां ॥ व शाश्वतासि निंदितां ॥
असे स्वतांच वागतां ॥ ह्मणूनि ताप भोगितां ॥

### ४ समानिका—य० पा०.

ती समानिका घडेल ॥ रा ज गा ल ज्या जडेल ॥
पादिं आठ अक्षरेंच ॥ सांॅगतों तुॅह्मां खॅरेंचॅ" ॥

चरणांत अक्षरें ८–गण–र, ज, ग, ल.

### उदाहरण. स्वकृत.

तूमचा मि दास सत्य ॥ जें कराल पारपत्य ॥
मान्य तें सुखास द्याल ॥ योग्य तें तुह्मी कराल ॥

### ५ अनुष्टुप्—य० पा०.

अनुष्टुप्छंद तें ज्याला ॥ एक नेम नसे गणीं ॥
अक्षरें चरणीं आठ ॥ देवा तारॅ मॅला त्वॅरें" ॥

चरणांत अक्षरें ८–गणांचा नियम नाहीं.

---

१ हिला 'नगस्वरूपिणी' असेंहि नांव आहे.

२ अनुष्टुप्छंदास जरी गणांचा नियम नाहीं, तरी प्रतिचरणाचें पांचवें अक्षर लघु असावें, सहावें गुरु असावें, आणि सम ( २,४ ) चरणांचें सातवें अक्षर लघु, व विषम ( १,३ ) चरणांचें सातवें अक्षर गुरु असावें, इतका नियम आहे.

**उदाहरण. बा०. मोरोपंत.**

सेवा करावया लावा देवा हा योग्य चाकर ॥
या तप्ताच्या शिरीं आर्त-पत्र[1] हो तुमचा कर ॥

---

**६ मणिबंध[2]—य० पा०.**

त्या मणिबंधातें धरिती ॥ **भा म स** यत्पादा वरिती ॥
अक्षरसंख्या यास नऊ ॥ सन्मन लोण्याहून मऊ ॥

चरणांत अक्षरें ९–गण—भ, म, स.

**उदाहरण. बा०.**

द्रव्य मिळावें याकरितां ॥ कां हलक्यांना आर्जवितां ॥
काय नव्हे हो तो धनवान् ॥ ईश रमेचा जो भगवान् ॥

---

**७ चंपकमाला—य० ५, ५.**

चंपकमाला तीस ह्मणावें ॥ **मा म स गा** ते जेथ गणावे ॥
पांचदुणी[3] पादाक्षर-संख्या ॥ शीघ्र धरावें सज्जनसख्या ॥

चरणांत अक्षरें १०–गण—भ, म, स, ग.

**उदाहरण. बा०.**

धाव मकुंदा दुष्टविमर्दा ॥ धाव रमेशा दुःखविनाशा ॥
फार विपत्ती फारच भीती ॥ यांस हरावें सत्वर यावें ॥

**८ हंसी—य० ४, ६.**

हंसी ऐसें ह्मणतिल तिथें ॥ येती पादीं **म भ न ग** जिथें ॥
एक्या पादीं अवयव[4] दहा ॥ मुक्तीमध्यें चिरसुख पहा ॥

चरणांत अक्षरें १०–गण—म, भ, न, ग.

**उदाहरण. बा०.**

या संसारीं चलच[5] सगळे ॥ आप्त स्नेही तनुधनबळें ॥
विश्वस्रष्ट्याविरहित[6] खरें ॥ विश्वासाचें स्थळ न दुसरें ॥

---

१ उन्हापासून संरक्षण करणारें छत्र, ह्मणजे छत्री. २ ह्या वृत्ताला 'मणिमध्य' असेंहि नांव आहे. ३ पांचदुणी ह्मणजे दहा. ४ अक्षरें. ५ चंचल. ६ जग उत्पन्न करणाऱ्या परमेश्वरावांचून.

### ९ मत्ता—य० ४, ६.

मत्ता ऐसें ह्मणतिल तीतें ॥ येती पादीं **म भ स ग** जीतें ॥
एक्या पादीं अवयव दाहा ॥ विद्याभ्यासीं" अविरत राहा" ॥

चरणांत अक्षरें १०—गण—म, भ, स, ग.

### उदाहरण दुसरें. स्वकृत.

होते जेव्हां सुसमयिं वृष्टी ॥ पावे तेव्हां सुख बहु सृष्टी ॥
चिंता आहे बहुतचि देवा ॥ त्याची आह्मी करूं बहु सेवा ॥

### १० कामदा—य० ५, ५.

बोलती कवी तीस कामदा ॥ **रा य जा ग** हे येति ज्या पदा ॥
अक्षरें तिथें मोजितां दहा ॥ भो दयानिधे" वारिं ताप हा" ॥

चरणांत अक्षरें १०—गण—र, य, ज, ग.

### उदाहरण. बा०. गोसावीनंदन.

घोर हा नको फार कष्टलों ॥ स्वा हितास मी व्यर्थ गुंतलों ॥
वारिं शीघ्र संसारयातना ॥ हे दयानिधे श्रीगजानना ॥

---

### ११ शुद्धकामदा—य० ६, ५.

ह्मणति तीस बा शुद्धकामदा ॥ **न र र ला ग** हे येति ज्या पदा ॥
चरणिं येति एकादशाक्षरें ॥ नृपतिमस्तकीं" छत्रचामरें" ॥

चरणांत अक्षरें ११—गण—न, र, र, ल, ग.

### उदाहरण. बा०. वामन.

प्रगटलासि तूं नंदगोकुळीं ॥ ह्मणुनि इंदिरावास[1] या स्थळीं[2] ॥
सकळही सुखी या व्रजीं हरी ॥ विरहदुःखिता गोपसुंदरी ॥

### १२ ललित—य० ५, ६.

त्यास हो कवी ललित बोलती ॥ **रा ज सा ल गा** चरणिं दीसती ॥
पांच आणि सा असति अक्षरें ॥ साधु बोलती" वचन तें खरें" ॥

चरणांत अक्षरें ११—गण—र, ज, स, ल, ग.

### उदाहरण दु०. स्वकृत.

संपदा असे बहुत ज्या घरीं ॥ खावया तिथें मिळति सोयरीं ॥
द्रव्य संपतां पळति तेथुनी ॥ कोणि पाहिना जवळ येउनी ॥

---

१ लक्ष्मीचें राहणें. २ गोकुळांत.

### १३ इंद्रवज्रा—य० पा०.

ती इंद्रवज्रा ह्मणिजे कवीनें ॥ येती **त ता जा ग ग** हे क्रमानें ॥
या अक्षरें येतिल पादिं अक्रा ॥ मारी अरी जो धरि शंखचक्रा" ॥
चरणांत अक्षरें ११—गण—त, त, ज, ग, ग.

### उदाहरण दु०. वेणीसंहार ना०.

कां टाकिलें शस्त्र रणांत तेणें[1] ॥ साक्षी पृथासूनुच एक जाणे ॥
हें कर्म झालें समरांत जेव्हां ॥ होतासि कोठें रणभीरु तेव्हां ॥

### १४ उपेंद्रवज्रा—य० पा०.

उपेंद्रवज्रा ह्मणतात तीला ॥ **ज ता ज गा गा** गण येति जीला ॥
पदास होणें शिव अक्षरांनीं ॥ पहा मनीं धुंडिशि काय रानीं ॥
चरणांत अक्षरें ११—गण—ज, त, ज, ग, ग.

### उदाहरण. बा०. रघुनाथ पं०.

तया वनीं एक तटाक तोयें ॥ तुडुंबलें तामरसानपायें ॥
निरंतरामंद मरंद वाहे ॥ तपांत ही यास्तव रिक्त नोहे ॥

### १५ उपजाति—य० पा०.

जेव्हां दिसे मिश्रण **इंद्रवज्रा** ॥ ह्यांचें पदीं आणि **उपेंद्रवज्रा** ॥
तेव्हां ह्मणावें उपजाति तीला ॥ पतीच हें दैवत हो सतीला" ॥
चरणांत अक्षरें ११—गण सदर ( १३ व १४ ).

### उदाहरण. बा०.

हा बाण गेला वरती मण्याला ॥ धरून पृथ्वीवर आणण्याला ॥
त्याणेंच आला परतून पक्षी ॥ पहा कसा निश्चल रत्न भक्षी ॥

### १६ शालिनी—य० ४, ७.

त्या वृत्ताला शालिनी हेंच नामें[3] ॥ जें **मा ता ता गा ग** यांचें स्वधाम ॥
एक्या[2] पादीं अक्षरें चार सात ॥ सच्छास्त्रांचा बोध आणा मनांत" ॥
चरणांत अक्षरें ११—गण—म, त, त, ग, ग.

---

१ त्यानें. अश्वत्थामा कर्णास ह्मणतो, द्रोणाचार्यानें शस्त्र कां टाकलें हें धर्मराज जाणतो. २ अकरा. ३ पादांतीं ऱ्हस्वास गुरुत्व येतें.

उदाहरण. बा०.

मी आत्मा हृत् इंद्रियें देह वाणी ॥ बुद्धी वांछा कल्पना वृत्ति यांणीं ॥
जीं जीं केलीं ज्ञात अज्ञात पापें ॥ तीं नाशावीं श्रीहरी स्वप्रतापें ॥

**१७ दोधक—य० पा०.**

दोधक नांव तयासचि देती ॥ तीन भ दोन ग हे गण येती ॥
अक्षरमान शिवासम जाणा ॥ सत्वर भेटवि तो यदुराणा" ॥

चरणांत अक्षरें ११—गण—भ, भ, भ, ग, ग.

उदाहरण. बा०.

सज्जन-पालन-पोषण-कर्ता ॥ सत्वर दुस्तर संकटहर्ता ॥
तोच खलांस भयंकर शास्ता ॥ वृत्त्यनुरूप हरी फलदाता ॥

**१८ रथोद्धता—य० पा०.**

वृत्त तेंच ह्मणती रथोद्धता ॥ रा न रा ल ग असेच तत्वता ॥
रुद्रसंमित पदांत अक्षरें ॥ शास्त्रतत्त्वें समजा मनीं खरें" ॥

चरणांत अक्षरें ११—गण—र, न, र, ल, ग.

उदाहरण. बा०. वामन पं०.

मोकळा करुनि कंठ तेधवां ॥ आठवूनि मनिं जानकीधवा ॥
तें रडे भरत ही तसा रडे ॥ जोंवरी नयन होति कोरडे ॥

**१९ स्वागता—य० पा०.**

स्वागता ह्मणति सुज्ञ तयाला ॥ रा न भा ग ग असे गण ज्याला ॥
अक्षरेंहि अकरा पदिं येती ॥ धन्य ते हरिपदीं मन देती" ॥

चरणांत अक्षरें ११—गण—र, न, भ, ग, ग.

उदाहरण. बा०. वामन पं०.

देखिलें नयनिं नंदकुमारा ॥ श्याम सुंदरवरा सुकुमारा ॥
मंद हास्य अतिरम्य मुखाचें ॥ दाखवी स्वमुख नित्य सुखाचें ॥

**२० मौक्तिकमाला—य० ५, ६.**

मौक्तिकमाला ह्मणति तयाला ॥ येतिल भा ता न ग ग जयाला ॥
अक्षरसंख्या शिवसम पादीं ॥ लुब्धचि होती" मृग मधुनादीं" ॥

चरणांत अक्षरें ११—गण—भ, त, न, ग, ग.

---

१ अकरा. २ अकरा. ३ रामास. ४ कौसल्या. ५ अकरा.

### उदाहरण. बा०. स्वकृत.

बोलति सारे पशुचि तयाला ॥ अक्षर नाहीं किमपि जयाला ॥
सौक्षरता[1] उत्तम पद देते ॥ व्यक्षरता[2] सद्यश धन नेते ॥

### २१ भ्रमरविलसित—य० ४, ७.

त्यांचीं नांवें भ्रमरविलसितें ॥ ज्यांच्या पादीं **म भ न ल ग** मितें ॥
एके पादीं अवयव[3] अकरा ॥ घॉयॉ घेर्मॉ" उॅशिरॅ नॅचॅ कॅरा" ॥
चरणांत अक्षरें ११—गण—म, भ, न, ल, ग.

### उदाहरण दु०. स्वकृत.

मुद्रा शोभे सुकनकघटिता ॥ कंठीं माला मणिगणखचिता ॥
माथां शोभे सुमन असित[4] तें ॥ अंगा लावी मलयज[5] नुसतें ॥

### २२ भद्रिका—य० पा०.

ह्मणति बुध तिलाच भद्रिका ॥ **न न र ल ग** हि जीस मुद्रिका[6] ॥
हरमित[7] पदिं अक्षरें गणा ॥ सॅतॅतॅ हॅरिहॅरी मुखें ह्मणा" ॥
चरणांत अक्षरें ११—गण—न, न, र, ल, ग.

### उदाहरण. बा०. रामचंद्रजोशी.

यदुपतिपदिं या मनास रे ॥ धरिं तरि भववासना सरे ॥
मिळतिल तुज फार मुद्रिका ॥ वसल घरिं सदैव भद्रिका[8] ॥

---

### २३ भुजंगप्रयात. य० ६, ६.

भुजंगप्रयात ह्मणावें तयाला ॥ क्रमानेंच येती य चारी जयाला ॥
पदीं ज्याचिया अक्षरें येति बारा ॥ रॅमानायॅका दुःखॅ माझें निॅवारा" ॥
चरणांत अक्षरें १२—गण—य, य, य, य.

### उदाहरण. बा०. रामदास.

मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें ॥ तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें ॥
जनीं निंद्य तें कर्म सोडोनि द्यावें ॥ जगीं वंद्य तें सर्वभावें करावें ॥

---

१ विद्वत्ता. २ मूर्खपणा, अज्ञान. ३ अक्षरें. ४ काळें. ५ चंदन. ६ गणरचना. ७ अकरा. ८ कल्याण.

### २४ द्रुतविलंबित—य० पा०.

द्रुतविलंबित वृत्त घडे तिथें ॥ **न भ भ र** क्रम हाच गणीं जिथें ॥
रविमितें[1] चरणांतिल अक्षरें ॥ त्वरितें घर्म करा अपुल्या करें ॥

चरणांत अक्षरें १२—गण—न, भ, भ, र.

**उदाहरण. बा०. वामन पं०.**

क्षणभरी जरि देहे[2] न सूटता ॥ तटतटां स्थळिंचे स्थळिं तूटता ॥
बळ असें कळलें खळसत्तमा[3] ॥ दुरुनि लक्षितसे पुरुषोत्तमा ॥

### २५ प्रियंवदा—य० ४, ४, ४.

कवि भले ह्मणति ती प्रियंवदा ॥ **न भ ज रा** गण असे जिच्या पदा ॥
चरणिचीं असति अक्षरें रवी[4] ॥ न करि तो अनय जो असे कवी ॥

चरणांत अक्षरें १२—गण—न, भ, ज, र.

**उदाहरण. स्वकृत.**

मुनिजनीं मदनसा दिसे सये ॥ मज गमे वर तुझ्या मनास ये ॥
जनकजेस रिझवूनिया तदा ॥ वदतसे निजसखी प्रियंवदा ॥

### २६ वंशस्थ—य० पा०.

तयास वंशस्थचि नाम ठेविती ॥ जयास **जा ता ज र** संघ[5] सेविती ॥
पदांत मासांइतकींच[6] अक्षरें ॥ पहा विचारूनि असल्य कीं खरें ॥

चरणांत अक्षरें १२—गण—ज, त, ज, र.

**उदाहरण. बा०. रघुनाथ पं०.**

लते तळीं रुंद निरुंद कालवे ॥ गळोनि तेथें मकरंद कालवे ॥
पराग ही सांद्र तयांत रंगती ॥ फुलांसवें भृंगतती तरंगती ॥

### २७ इंद्रवंशा—य० पा०.

ती इंद्रवंशा कविराज हेरिती ॥ **ता ता ज रा** हे गण येति ये रिति ॥
पादामध्यें भानुमितेंच[7] अक्षरें ॥ नाहीं प्रपंचांतिल सौख्य तें खरें ॥

चरणांत अक्षरें १२—गण—त, त, ज, र.

---

१ बारा. २ कालियसर्पाचा देह. ३ दुष्टांमध्यें श्रेष्ठ अशा कालियसर्पास. ४ बारा. ५ गण. ६ बारा. ७ बारा.

### उदाहरण. बा०. रामचंद्र जोशी.

गोपी हरीच्या भजनांत रंगल्या ॥ तें पाहुनी देवि मनांत भंगल्या ॥
हें सौख्य आह्मां न जनांत पातल्या ॥ कीं इंद्रवंशांत हि जन्म घेतल्या ॥

### २८ तोटक—य० पा०.

वदती कवि तोटक वृत्त तया ॥ चरणीं स[1]चतुष्टय येत जया ॥
दश आणिक दोन पदाक्षर तीं ॥ दृढ हीं[2] असतीं तरि कां क्षरतीं" ॥
चरणांत अक्षरें १२—गण—स, स, स, स.

### उदाहरण. बा०. नवनीत.

जर विस्तृत नेत्र अशी असली ॥ हरिणी तुजला दिसली असली ॥
तर मानवरूपवती हरिणी ॥ चल सत्वर दाखिव ती रमणी ॥

### २९ जलोद्धतगति—य० ६, ६.

जलोद्धतगती तिलाच ह्मणती ॥ जिथें गण ज सा ज सा च घडती ॥
पदीं असति अक्षरें र[3]विमिती ॥ अनंत सुख तें" मुखें वदुं किती" ॥
चरणांत अक्षरें १२—गण—ज, स, ज, स.

### उदाहरण. बा०. रामचंद्र जोशी.

जनाचि सखि लाज ही विसरली ॥ * * * *
नसे नवल ऐकतांचि मुरली ॥ मती तिजमधें समग्र मुरली ॥

### ३० स्रग्विणी—य० पा०.

स्रग्विणी वृत्त हें नांव देती तया ॥ पादिं येती र हे सर्व[4] चारी जया ॥
होति बारा पदीं अक्षरें मोजितां ॥ सौख्य होतें मना ईश्वरीं योजितां" ॥
चरणांत अक्षरें १२—गण—र, र, र, र.

### उदाहरण. बा०. रा० जो०.

राधिका रात्रि दारीं उभी राहिली ॥ श्रीधरानें शरत्कालिं ती पाहिली ॥
पूर्णचंद्रानना ध्वांतविद्राविणी[5] ॥ पूर्णमासीच मुक्ताफलस्रग्विणी[6] ॥

---

१ चार सगण. २ हीं इंद्रियें. ३ बारा. ४ गण. ५ अंधार नाहींसा करून टाकणारी. ६ मोत्यांची माळ धारण करणारी.

### ३१ प्रमिताक्षरा—य० पा०.

प्रमिताक्षरा ह्मणति तीस कवी ॥ पदिं **सा ज सा स** गण हे वदवी ॥
पदिं अक्षरें रविमितें असती ॥ पतिवांचुनी सुख गणी न सती ॥

चरणांत अक्षरें १२—गण—स, ज, स, स.

### उदाहरण. स्वकृत.

सकला जनास सुखदा सरसा ॥ रविभा[2] जशी उदयिं तामरसा ॥
गुरुवाक्करीलचि भवाब्धि रिता ॥ हरिपादजा जशि सिता सरिता[3] ॥

### ३२ वैश्वदेवी—य० ५, ७.

त्या त्या वृत्ताला बोलती वैश्वदेवी ॥ ज्या ज्या पादीं हे दोनदा **माय**[4] ठेवी ॥
एकैका पादीं अक्षरें येति बारा ॥ मिथ्या मानावा हा प्रपंची पसारा ॥

चरणांत अक्षरें १२—गण—म, म, य, य.

### उदाहरण. वा०. नवनीत.

या जन्मामध्यें इंद्रियें देह वाणी ॥ आत्माहृद्वांछा कल्पना वृत्ति यांणीं ॥
जीं जीं मीं केलीं ज्ञात अज्ञात पापें ॥ तीं तीं नाशावीं श्रीहरि स्वप्रतापें ॥

### ३३ मालती—य० ५, ७.

कविजन बोलति तीस मालती ॥ **न ज ज र** हे गण जीस लागती ॥
भरतिल पादिं शरर्षि[5] अक्षरें ॥ त्वरित करा अपुलें तुह्मी बरें ॥

चरणांत अक्षरें १२—गण—न, ज, ज, र.

### उदाहरण. वा०. रा० जोशी.

निशि सुजना तिजला घरीं पहा ॥ नयन सुखावह रत्न हें महा ॥
नगमणि[6] घालुनियां दिसे कशी ॥ कनकलता नवमालती जशी ॥

### ३४ यूथिका—य० ३, ९.

यूथिका ह्मणति वृत्त कवी तया ॥
**रा न भा र** गण येतिल हे जया ॥
अक्षरें चरणिं तीन नऊ पहा ॥
लाभ होइल तुला तरि हा महा ॥

चरणांत अक्षरें १२—गण—र, न, भ, र.

---

१ बारा. २ सूर्याची कांति. ३ पांढरी नदी–भागीरथी. ४ दोन मगण व दोन यगण. ५ शर=५, ऋषि=७ मिळून १२. ६ भूषणें आणि रत्नें.

**उदाहरण. बा०. अनंतकवि.**

दीर्घ रोदन वनीं लहु आयके ॥
कोण गांजित असे मम अंबिके ॥
बाण तीक्ष्ण सशितीं धनुषीं करी ॥
येउनी नमुनि बोलत सुंदरी ॥

---

**३५ प्रभावती—य० ४, ९.**

प्रभावती ह्मणति सुवृत्त तें [1]गुरू ॥
जया पदीं ज भ स ज शेवटीं गुरू ॥
पदामधें त्रिदशचि येति अक्षरें ॥
दयानिधी" करिलचि आमुचें बरें" ॥

चरणांत अक्षरें १३—गण—ज, भ, स, ज, ग.

**उदाहरण. बा०.**

[2]चराचरा प्रति उदयास आणितो ॥
जगत्पती अखिल हि हार्द[3] जाणतो ॥
दयानिधी सकळ विपत्ति वारितो ॥
समर्थ तो शरण जनास तारितो ॥

**३६ मंजुभाषिणी—य० ५, ८.**

ह्मणती कवी तिसचि मंजुभाषिणी ॥
चरणीं जिच्या स ज स जा ग दाटणी ॥
भरती पदीं त्रिदशसंख्य अक्षरें ॥
ठसवा मनीं" सदुपदेश आदरें" ॥

रणांत अक्षरें १३—गण—स, ज, स, ज, ग.

**उदाहरण. बा०. रा० जोशी.**

हरिवांचुनी घडिभरी घरीं नसे ॥
भुलली तया सतत कायमानसें ॥
*        *        *
ह्मणतां कशी गरिब मंजुभाषिणी ॥

---

१ श्रेष्ठ. २ चर + अचर=स्थावर व जंगम पदार्थांस. ३ मनांतील आशय.

### ३७ प्रहर्षिणी—य० ३, १०.

वृत्तातें ह्मणति कवि प्रहर्षिणी त्या ॥
आरंभीं म न ज र शेवटीं ग ये ज्या ॥
एकैका चरणिं सदक्षरें हि तेरा ॥
देवाचें चरितें कसें विचित्र हेरा ॥

चरणांत अक्षरें १३—गण—म, न, ज, र, ग.

### उदाहरण. बा०.

अंगानें सरल तसाच तो मनानें ॥
कालानें चल न तसाच तो धनानें ॥
विद्येनें सरस तसाच तो मतीनें ॥
उक्तीनें चतुर तसाच तो कृतीनें ॥

### ३८ मत्तमयूरी[1]—य० ४, ९.

त्या वृत्ताला बोलति ते मत्तमयूरी ॥
जेथें येती मा त य सा गा गणपूरी ॥
पादीं पादीं अक्षरसंख्या सम तेरा ॥
श्रीरामाच्या पादसरोजीं[2] सुख हेरा ॥

चरणांत अक्षरें १३—गण—म, त, य, स, ग.

### उदाहरण. बा०. रा० जोशी.

माता भ्राता तूं भयनाशा सखया जी ॥
गेले स्नाना विप्र तयां अन्न न भाजी ॥
आतां देती शाप सहासी वनिं[3] कृष्णा ॥
हाका मारी मत्तमयूरीपरि कृष्णा ॥

### ३९ विभावरी—य० पा०.

वदति ते कवि तयास विभावरी ॥
न भ ज जा ग गण ज्या चरणावरी ॥

---

१ 'मत्तमयूर' असेंहि नांव आहे. २ चरणकमळीं. ३ दुर्वास अन्न मागावयास गेला तेव्हां द्रौपदी कृष्णाला हाक मारते.

त्रिदश जाण चरणांतिल अक्षरें ॥
गुरुवचें करितें जो अति आदरें ॥
चरणांत अक्षरें १३—गण—न, भ, ज, ज, ग.

**उदाहरण. बा०. अनंतकवि.**

रुदन ते करितसे जनकात्मजा ॥
कुमति ते उपजली कशि आत्मजा ॥
तुरग बांधुनि जिवावरि ऊठला ॥
पडतसे धरणिं होउनि आकुला ॥

---

**४० वसंततिलका—य० पा०.**

जाणा वसंततिलकाव्हय तेंच वृत्त ॥
येती जिथें **त भ ज जा ग ग** हे सुवृत्त ॥
संख्या चतुर्दश पदांतिल अक्षरांची ॥
होते जनांत अपकीर्ति निरक्षरांची ॥
चरणांत अक्षरें १४—गण—त, भ, ज, ज, ग, ग.

**उदाहरण. बा०. शाकुंतल ना०.**

घोडे कधीं न खळती रविच्या रथाचे ॥
उल्लंघितो पवन भाग सदा नभाचे ॥
भूभार शेष धरि संतत मस्तकांहीं ॥
राजास विश्रम तसा क्षणमात्र नाहीं ॥

**४१ प्रहरणकलिता—य० ७, ७.**

प्रहरणकलिता कवि ह्मणति तिला ॥
**न न भ न ल ग** हे गण असति जिला ॥
अवयव चवदा प्रतिपदिं भरले ॥
गुरुपद धरितां जन बहु तरले ॥
चरणांत अक्षरें १४. गण—न, न, भ, न, ल, ग.

---

१ जानकी ही रामाचा अश्व लहूनें धरला तेव्हां शोक करिते. २ ह्या वृत्ताला 'सिंहोद्धता,' 'उद्धर्षिणी,' 'मधुमाधवी,' अशींहि नांवें आहेत. ३ अक्षरें.

**उदाहरण. बा० रा० जो०.**

निशिदिनिं रिपुचें भय जरि तुजला ॥
अठिव सतत तूं विषधरसतिला ॥
अवन करिल ती जननि तशि सदा ॥
त्यजिल न महिषासुरमथनि कदा ॥

**४२ असंबाधा—य० ५, ९.**

त्या वृत्ताला बोलति सुकवि असंबाधा ॥
ज्याच्या पादीं ये **म त न स ग ग** निर्बाधा ॥
एके पादीं अक्षर भरतिल तीं चौदा ॥
पुण्याचा तूं लौकर करिं मनुजा सौदा" ॥
चरणांत अक्षरें १४—गण—म, त, न, स, ग, ग.

**उदाहरण. बा०. मोरोपंत.**

मोठे दाते ते तनुधनसह गेले कीं ॥
स्वर्गा त्यांचे भूवरि सुत नुरले लोकीं ॥
गौळीयांतें तो यदुपति दिसतो साधा ॥
भक्तांची जो दूर सहज करितो बाधा ॥

**४३ मध्यक्षामा—य० ४, १०.**

मध्यक्षामा सुकवि ह्मणति त्या वृत्ताला ॥
पादीं पादीं **म भ न य ग ग** येती ज्याला ॥
एके पादीं अवयव चवदा बा येती ॥
दाते ते जे" तनुधन गरिबांला देती" ॥
चरणांत अक्षरें १४—गण—म, भ, न, य, ग, ग.

**उदाहरण. स्वकृत.**

*  *  *  *
*  *  *  *

कुंजारण्या प्रति हरिसह राधा गेली ॥
तेथें त्यांनीं बहुविध चिर केली केली ॥

---

१ दुर्गेला. २ रक्षण. ३ क्रीडा.

### ४४ मालिनी—य० ८, ७.

ह्मणति कवि तयाला मालिनी वृत्त तेव्हां ॥
**न न म य य** असे हे संघ[1] येतात जेव्हां ॥
प्रतिचरणिं हि पंध्रा अक्षरें हीं तयाचीं ॥
हॅरिहॅर-चॅरणांला" आपुलें हींतॅं यांचीं" ॥

चरणांत अक्षरें १५—गण—न, न, म, य, य.

**उदाहरण. बा०. शाकुं० ना०.**

तरुवर सुफलांच्या आगमीं नम्र होती ॥
जलद हि जलभारें खालती फार येती ॥
सुपुरुष विनयातें भाग्यकालीं धरीती ॥
उपकृति करित्यांची जाणिजे हीच रीती ॥

### ४५ चामर—य० पा०.

चामराख्य वृत्त तेंच बोलती कवी सदा ॥
जेथ **रा ज रा ज रा** असेच लागती पदा ॥
मोजितां पदांत होति अक्षरें हि पंधरा ॥
पाहॅतांचि सॅज्जनांसॅ वांकॅवावि कंधॅरा[2]" ॥

चरणांत अक्षरें १५—गण—र, ज, र, ज, र.

**उदाहरण. बा०. राम० जोशी.**

राधिका पहावयास जातसे रमापती ॥
प्राकृतासमान त्यास वृद्ध गोप कोपती ॥
त्यां कळे न हा हरीच गोकुळांत पामरा ॥
नीच मार्जनीसमान[3] मानितात चामरा ॥

---

### ४६ पंचचामर—य० पा०.

तयास पंचचामराख्य वृत्त बोलती सदा ॥
**ज रा ज रा ज गा** असेच संघ ज्याचिया पदा ॥
दहा सहा पहा गणून अक्षरें पदांत या ॥
जॅयांचियां मॅनांसि शांति सौख्यॅ सॅर्वदां तॅयां" ॥

चरणांत अक्षरें १६—गण—ज, र, ज, र, ज, ग.

---

१ गण. २ मान, कंठ. ३ केरसुणी.

**उदाहरण. वा०. वेणीसं० ना०.**

अर्जून केश तूमचे विमुक्त नाहिं जाहले ॥
कशी करील बद्ध ही अधींच बाइ आपले ॥
अशा मदीय उत्तरें मनांत फार खोंचली ॥
जणू गमे तिला उरीं सुरीच काय बोंचली ॥

---

**४७ शिखरिणी—य० ६, ११.**

तया वृत्ता देती विबुध जन संज्ञा शिखरिणी ॥
जयामध्यें येती **य म न स भ** ला गा गण गणीं ॥
दहा आणि सात प्रतिचरणिं ही अक्षरमिति ॥
"विसांवा तो घ्यावा" गुरुचरणिं सांगू तुज किती" ॥

चरणांत अक्षरें १७—गण—य, म, न, स, भ, ल, ग.

**उदाहरण. वा० रघुनाथ पं०.**

कदा नेणों ओढी शरधितुनि काढी शर कदा ॥
कदा धन्वी जोडी वरिवरिहि सोडी तरि कदा ॥
विपक्षाच्या वक्षावरि विवरलक्षास्तव रणीं ॥
कळे राजेंद्राची त्वरित शरसंधानकरणी ॥

**४८ पृथ्वी—य० ८, ९.**

सुवृत्त बहु चांगलें ह्मणति सुज्ञ पृथ्वी तया ॥
अधीं **ज स ज** त्यापुढें **स य ल** गा हि येती जया ॥
पदांत सतरा पहा असति अक्षरें मोजुनी ॥
"पदा शरण येति ते" तरति कीर्ति ऐशी जुनी" ॥

चरणांत अक्षरें १७—गण—ज, स, ज, स, य, ल, ग.

**उदाहरण. वा० मोरोपंत.**

प्रसाद तुमचा [3]कळानिधिहुनी गुणें आगळा ॥
हरी [4]नतमनोमळा [5]निजसुरद्रुमांचा मळा ॥

---

१ द्रौपदीच्या दासीनें दुर्योधनाची स्त्री भानुमती हिला उत्तर केलें आहे. २ नळराजाचें वर्णन आहे. ३ चंद्रापेक्षां. ४ शरणागतांच्या मनांतील दोषास. ५ आपल्या भक्तांस कल्पतरूंचा.

करी रत सदा बळानुजपदीं[1] मना चंचळा ॥
सुखेंचि पुरवी लळा सुचिर कीर्ति दे उज्ज्वळा ॥

**४९ हरिणी—य० ६, ४, ७.**

ह्मणति हरिणी त्या वृत्ताला पशूंत जसी रुरू[2] ॥
**न स म र स** हे आधी येती पुढेंच **लघू गुरू** ॥
प्रति चरणिंही येती सत्रा समानचि[3] अक्षरें ॥
शॅरॅणॅ गुॅरुच्या" पाया जावें" कॅरीलॅचि तो बॅरें" ॥
चरणांत अक्षरें १७—गण—न, स, म, र, स, ल, ग.

**उदाहरण. बा०. मोरोपंत.**

अभय दिधलें आहे वाहे शुचि प्रतिभाझरा[4] ॥
विधुमणिचिया[5] सारा ताराप[6] कारण पाझरा ॥
जडहि कविता जोडी गोडी गुणीं हरिच्या धरी ॥
सहज तुमचा हीना दीना प्रसाद समुद्धरी ॥

**५० मंदाक्रांता—य० ४, ६, ७.**

मंदाक्रांता ह्मणति तिजला वृत्त तें मंद चाले ॥
ज्याच्या पादीं **म भ न त त** हे आणि **गा** दोन आले ॥
एक्या पादीं गणति सतरा अक्षरांचीच होते ॥
कॉढी रामा" भॅवॅनॅदिॅतुॅनी" खातॅसें फॉरॅ गोते" ॥
चरणांत अक्षरें १७—गण—म, भ, न, त, त, ग, ग.

**उदाहरण. बा०. उत्तरराम० ना०.**

हाहा[7] देवी हृदय फुटतें देह माझा गळाला ॥
वाटे शून्य त्रिभुवन मला, अंतरात्मा जळाला ॥
या आत्म्यानें किति तरि सदा दुःखभारा धरावें ॥
मोह व्यापी फिरफिरुनि म्यां काय आतां करावें ॥

---

१ बळरामाचा धाकटा भाऊ कृष्ण ह्याच्या चरणीं. २ मृगाची एक जात. ३ चारी चरणांत सारखीं. ४ स्फूर्तिरूप झरा ह्मणजे प्रवाह. ५ चंद्रकांत मण्याच्या. ६ चंद्र. ७ सीताविरहामुळें रामचंद्र शोक करतो.

**५१ विबुधप्रिया—य० ३, ५, ५, ५.**

होतसे विबुधप्रियाव्हय वृत्त तें बरवें तिथें ॥
**रा स जा ज भ रा** असे गण येति सा सरसे जिथें ॥
अक्षरें अठराच येतिल पादिं मोजुनियां पहा ॥
दीनतारक दुःखहारक शत्रुमारक राम हा" ॥
चरणांत अक्षरें १८—गण—र, स, ज, ज, भ, र.

**उदाहरण. बा०. रामचंद्र जोशी.**

राधिका सखि आज ती मज आणि भेटिस राजसे ॥
देतसें धन फारसें तव मानसा अवडे तसें ॥
चित्त हें तिज पाहुनी भ्रमलें दुजी न सुचे क्रिया ॥
प्राण जाइल वाटतो जरि येइना विबुधप्रिया ॥

---

**५२ शार्दूलविक्रीडित—य० १२, ७.**

आहे वृत्त विशाल त्यास ह्मणती शार्दूलविक्रीडित ॥
**मा सा जा स त ता ग** येति गण हे पादास कीं जोडित ॥
एकोणीस पहा गणूनि चरणीं येतात हीं अक्षरें ॥
तेजःपुंज नभोगणीं[1] पसरलीं" रत्नें पहा नक्षरें[2]" ॥
चरणांत अक्षरें १९—गण—म, स, ज, स, त, त, ग.

**उदाहरण. बा०. मोरोपंत.**

जो लोकत्रितयीं फिरे स्थिर नसे ताटीं जसा पारद[3] ॥
स्वांतध्येयपदींच[4] निश्चल भवांभोधींत[5] जो पार-द[6] ॥
जो वर्णें गगनोदरीं क्षण दिसे पूर्णेंदु कीं शारद[7] ॥
श्रीशांतःपुरचत्वरींच[8] उतरे तो सन्मुनी नारद ॥

---

**५३ स्रग्धरा—य० ७, ७, ७.**

कंठीं माळा धरी जी सुरुचिर तिजला स्रग्धरा नाम देती ॥
त्या वृत्तीं एकपादीं **म र भ न य य या** हे गण स्पष्ट येती ॥

---

१ आकाशरूप अंगणांत. २ नक्षत्रें. ३ पारा. ४ परमेश्वरचरणीं. ५ भवसमुद्रांत. ६ पलीकडच्या तीरास लावणारा. ७ शरदृतूंतील. ८ कृष्णाच्या जनानखान्याच्या अंगण्यांत.

ज्याच्या प्रत्येक पादीं भरतिल गणितां अक्षरें एकवीस ॥
श्रीरामाचें स्वभद्र"-स्मरण मग कसें" होइना तें कवीस" ॥
चरणांत अक्षरें २१—गण—म, र, भ, न, य, य, य.

**उदाहरण. बा० मोरोपंत.**

[1]माझा प्रेमा सुदामा हरिसख दुबळा शब्द-[2]संदोह जो हे ॥
साधूंपा[4]शीं [3]श्रुतीनें पदर पसरुनी जोडिले स्वल्प पोहे ॥
या दीनोपायनातें बुधजन भगवान् प्रीतिनें फार गोडी ॥
आणोनी [5]श्रोत्रवक्त्रीं भरिल बहु दया मानुनी तेहि थोडी ॥

**५४ अमृतध्वनि—य० ४, ७, ७, ४.**

सारामृतध्वनि उदारा नरा सुखवि दारा तिलाच ह्मणती ॥
**ता भा य जा स र न गा** हेच जेथ गण एकैक पादिं गणती ॥
बेवीस येति चरणीं अक्षरें गणुनि पाहींच संशय जरी ॥
रक्षावया" परमभक्तास संकटिंच दैत्या वधी" नरहरी" ॥
चरणांत अक्षरें २२—गण—त, भ, य, ज, स, र, न, ग.

**उदाहरण. बा० आनंदतनय.**

[6]माला करीं हृदय भालासि तें [7]भसित ज्याला [8]मृगाजिन कटी ॥
लोला[9] जटा रुळति [10]दोलापरी परम कोलाहलध्वनि उठी ॥
हा लाभ मानुनिच [11]नीलालका सुकृतशीला तयास नमिती ॥
आला मुनी निज घराला ह्मणूनि मग झाला पुढें नरपती ॥

**५५ मंदारमाला—य० ४, ६, ६, ६.**

मंदारमाला कवी बोलती हीस कोणी हिला अश्वधाटी असें ॥
**[12]सातातकारीं** जिथें हा घडे पाद तेथें **गुरू** एक अंतीं वसे ॥
या मोजितां एकपादांत निभ्रांत येतील बेवीस कीं अक्षरें ॥
वारावया" ताप तारावया" यास नारायणा" तूंचि ये सत्वरें" ॥
चरणांत अक्षरें २२—गण—त, त, त, त, त, त, त, ग.

---

१ मोरोपंत कवीनें आपला प्रेमा आणि सुदामा ह्यांचें रूपक केलें आहे. २ समुदाय. ३ कानानें. ४ गरिबाच्या भेटीच्या वस्तूस. ५ कर्णरूप मुखांत. ६ जनकाच्या घरीं विश्वामित्र गेला त्याचें वर्णन आहे. ७ भस्म. ८ हरिणाचें कातडें. ९ चंचल. १० झोपाळ्यासारख्या. ११ काळ्या केसांच्या ( स्त्रिया ). १२ सात तगणांनीं.

**उदाहरण. बा० मोरोपंत.**

वाचाळ मी नीट पाचारितों धीट याचा नयो वीट साचा हरी ॥
खोटा जरी मी चखोटा मधें तूंचि मोठा कृपेचा न तोटा धरीं ॥
दाता सुखाचा सदा तारिता आपदाताप हे एकदा तीपटीं ॥
या संतसेवाव्हया संपदा हे भया संग नाशील या संकटीं ॥

**५६ उमा—य० ६, ६, ६, ४.**

तीस उमा कवि बोलती जी बहु आवडती गिरिशास सती ॥
तत्पदिं **सात भनामक** हे गण शेवटिं एक **गुरू** असती ॥
बाविस अक्षर दावि सदा पद लागुनि राहिल नेमचि या ॥
मीन जळाविण" दीन तसा हरि" हीन कृपेविण" मी तुझिया" ॥
चरणांत अक्षरें २२—गण—भ, भ, भ, भ, भ, भ, भ, ग.

**उदाहरण. बा० आनंदतनय.**

यापरिचे भवतापविमोचन चापशरांकित भव्यमती ॥
पाहुनि सर्व नृपांहुनि उत्तम लाहुनि तोष पुसे नृपती ॥
कोण असे महिपाळक बाळक हे जगचालकसे सुचले ॥
सांग मला सहसागमनाशय चांग मनांत मला रुचले ॥

---

**५७ मदिरा—य० ६, ६, ६, ५.**

ती मदिरा कवि बोलति जी मन मोहुनियां जन लाविल नादीं ॥
ज्या गण **सात भनामक** आधिंच दोन **गुरू** मग येतिल पादीं ॥
अक्षरसंमिति पाहसि तूं जरि तेविस होतिल नेमचि याचा ॥
साधुनि सत्वर" घ्या स्वहिता तुह्मि" कांहिंच नेम नसे स्वयाचा" ॥
चरणांत अक्षरें २३—गण—भ, भ, भ, भ, भ, भ, भ, ग, ग.

**उदाहरण. स्वकृत.**

पाहुनि दीनजनांस जळाविण मीन तसा अति दुःखित होतो ॥
कष्टवुनी निजदेह जना बहु तुष्टवि नित्यचि साधु अहो तो ॥
जो उपकार करी सुजनावरि अंतरिं निर्मळ भाव धरीतो ॥
साधितसे परकीयहिता परि साधन आत्महितींच करी तो ॥

---

१ दूर घालीव. २ संतसेवारूप. ३ शंकरास. ४ धनुष्यबाणांनीं युक्त. ५ येण्याचा हेतु. ६ चांगले.

### ५८ मदिरा किंवा सवाई—य० ६, ६, ६, ५.

ठेविति नाम तया मदिरेसचि थोरथोर कविराज सवाई ॥
**चार भकार** पुढें **र न भा ग ग** जेथ जेथ गण येतिल पाई ॥
यांतहिं तेविस अक्षरसंमिति पादिं पादिं सम मोजुनि घेई ॥
सज्जन संग निरंतर जोडुनि दुष्टसंगतिस सोडुनि देई ॥
चरणांत अक्षरें २३—गण—भ, भ, भ, भ, र, न, भ, ग, ग.

### उदाहरण. बा० मोरोपंत.

राम रघूत्तम कामरिपुप्रिय लोकशोकहर यापरि भावें ॥
दाशरथे तुज होउनियां पदिं लीन दीनजनबंधुसि गावें ॥
आमरण स्मृति हेच असो वय याच साच सुपथांत सरावें ॥
दे वरदा वर या शरणाप्रति पापतापजलधीस तरावें ॥

### ५९ दुसरी सवाई—य० ७, ६, ६, ४.

कविजन त्या मदिरेसचि लक्षुनि ठेविति नाम सवाइ तिला ॥
प्रथम **नकार जकार सहा** मग शेवटिं ते **ल ग** येति जिला ॥
भरतिल तेविस अक्षर एक पदीं जरि मोजुनि पाहसि तीं ॥
प्रतिदिन वाढतसे हि उणावतसे विधु पक्षिं[1] सितीं असितीं[2] ॥
चरणांत अक्षरें २३—गण—न, ज, ज, ज, ज, ज, ज, ल, ग.

### उदाहरण. बा० मोरोपंत.

शिवहृदयालय[3] कीं सुखदायक निर्जरनायकसेव्यपदा[4] ॥
अभय मला जरि देसि अपाय निवारुनि पाय नमीन सदा ॥
तुज भुजगाभभुजासि[5] असे वर मागतसें वरदान करा ॥
रघुकुलवंशावतंस दशाननसंततिकाननदाहकरा[6] ॥

---

१ शुक्लपक्षांत. २ कृष्णपक्षांत. ३ महादेवाच्या अंतःकरणांत राहणाऱ्या. ४ इंद्रानें सेवा करण्यास योग्य आहे पद ज्याचें अशा. ५ सर्पासारखे ज्याचे बाहु आहेत अशा तुला. ६ रावणाच्या संततिरूप अरण्याचा दाह करणाऱ्या.

## अर्धसमवृत्तें.*

### ६० हरिणीप्लुता.

विषमीं त्रिसकार ल गा असे ॥ **न भ भ र** क्रम हाच समीं वसे ॥
विषमीं अकरा चरणीं युता ॥ द्विदश अक्षर ती हरिणीप्लुता ॥

चरण १, ३–अक्षरें ११—गण—स, स, स, ल, ग.
चरण २, ४–अक्षरें १२—गण—न, भ, भ, र.

**उदाहरण. वा०.**

मजला गिरिराज कळीव या ॥ वनलतांत न कीं लपली प्रिया ॥
कृश अंग तिचें अति निर्मळ ॥ प्रिय निरंतर भाषण कोमळ ॥

### ६१ माल्यभारा.

विषमींच पदीं **स सा ज गा गा** ॥ समपादीं **स भ रा य** येति भागा ॥
विषमीं अकरा समींच बारा ॥ तरि संज्ञा तिस होय माल्यभारा ॥

चरण १, ३–अक्षरें ११—गण—स, स, ज, ग, ग.
चरण २, ४–अक्षरें १२—गण—स, भ, र, य.

**उदाहरण. वा० प्रसन्नराघव.**

निजकाव्यरसेंच तृप्त होती ॥ पण काव्यें परकीय साधु गाती ॥
निजपुष्परसें अळें बुडालें ॥ पण तो कुंभजळेंच आम्र डोले ॥

### ६२ पुष्पिताग्रा.

विषमिंच चरणीं **ननारया** हा ॥ **नजजर गा** क्रम हा समांत पाहा ॥
द्वि[1]दश विषमिं अक्षरें समग्रा ॥ त्रि[2]दशसमीं पदिं तीच पुष्पिताग्रा ॥

चरण १, ३–अ० १२—गण—न, न, र, य.
चरण २, ४–अ० १३—गण—न, ज, ज, र, ग.

---

* अलीकडे 'अर्धसमवृत्तांत' **वियोगिनी** छंद बराच येऊं लागला आहे. त्याचें लक्षण तात्यांनीं आपल्या ग्रंथांत लिहिलें नाहीं. तें लक्षण आह्मीं त्यांच्याच कित्याप्रमाणें यथामति नवीन तयार केलें आहे तें वाचकांस सादर करितों:—
विषमीं **ससजा गुरू** असे । समिं **साभारलगाच** येतसे ॥ प्रथम त्रितयींच
या क्रमा । दुसऱ्या आणिक तुर्य पादिं मा ॥ १ बारा. २ तेरा.

**उदाहरण. बा० रामचंद्र जोशी.**

नृपजननगरींत सोय पाहा ॥ नृपभजना त्यजुनी घरीं न राहा ॥
नगरिहि भरली दिसे समग्रा ॥ ध्वजशिखरीं लतिकाच पुष्पिताग्रा ॥

---

## मात्रागणवृत्तें.

मात्रागणवृत्तांचे आर्या, गीति, उपगीति, उद्गीति, व आर्यागीति, असे पांच भेद आहेत.

### ६३ आर्यालक्षण.

आर्येच्या प्रथमपदीं, द्वादश मात्रा तशाच तिसऱ्याला ॥
अष्टादश[1] दुसऱ्याला आणिक चवथ्यास पंचदश[2] ॥
प्र० च०—मात्रा १२; द्वि० च०—मात्रा १८;
तृ० च०—मात्रा १२; च० च०—मात्रा १५.

**उदाहरण. बा० उत्तरराम० ना०.**

नूतन पल्लव फुटला, असला तरु आणिला प्रियेनें तो ॥
लवकर चाखायाला, तोंडाशीं गज पहा नेतो ॥

### ६४ गीतिलक्षण.

गीतीच्या प्रथमपदीं, द्वादश मात्रा तशाच तिसऱ्याला ॥
दुसऱ्या पादीं अठरा, मात्रा असती तशाच चवथ्याला ॥
प्र० च०—मात्रा १२; द्वि० च०—मात्रा १८;
तृ० च०—मात्रा १२; च० च०—मात्रा १८.

**उदाहरण. बा० मोरोपंत.**

तरला ययाति राजा, दर्शन होतांच संतरायाचें ॥
सद्दर्शनचि सुदर्शन, करि गट चट कटक अंतरायांचें[3] ॥

### ६५ उपगीतिलक्षण.

उपगीतीच्या पहिल्या तिसऱ्याही द्वादशचि मात्रा ॥
दुसऱ्या आणिक चवथ्या मात्रा पादांत पंध्राची ॥

---

१ अठरा. २ पंधरा. ३ विघ्नांचें.

प्र० च०—मात्रा १२; द्वि० च०—मात्रा १५;
तृ० च०—मात्रा १२; च० च०—मात्रा १५.

### उदाहरण. वा०.

यत्नें श्रेय कळाया, शास्त्रानुभवहि तसा भावें ॥
सद्गुरुला शरण कपट, दंभहि टाकूनियां जावें ॥

### ६६ उद्गीतिलक्षण.

उद्गीतीच्या पहिल्या तिसऱ्याही द्वादशचि मात्रा ॥
दुसऱ्या पादीं पंध्रा, चवथ्या पादांत येति [1]अष्टदश ॥
प्र० च०—मात्रा १२; द्वि० च० मात्रा—१५.
तृ० च०—मात्रा १२; च० च० मात्रा—१८.

### उदाहरण. स्वकृत.

देवा मी शरण तुला, आलों मज तूंचि सांभाळीं ॥
तूंचि समर्थ पुसाया, दुर्लिपि माझ्या असेल जी भाळीं ॥

### ६७ आर्यागीतिलक्षण.

पहिल्या चरणीं बारा मात्रा दुसऱ्यांत सात आणी तेरा ॥
उभयदळीं हे रीती जीस तिला ह्मणति सुज्ञ आर्यागीती ॥
प्र० च०—मात्रा १२; द्वि० च०—मात्रा २०
तृ० च०—मात्रा १२; च० च०—मात्रा २०

### उदाहरण. वा० मोरोपंत.

मी प्रिय करिन सकळवा आहे कीं, व्रज अहो [2]असाध्वस कळवा ॥
वि[3]वसा घरिं घो[4]रांनीं रात्रि फिरावें शिवेच्छु न निघो रानीं ॥

आर्येचे, पथ्या, चपला, विपुला इत्यादि अवांतर भेद पुष्कळ आहेत तें एथें सांगितले नाहींत.

---

### प्राकृत छंद अथवा वृत्तें.

केवळ प्राकृत कवितेंत मात्र येणारे असे कांहीं छंद आहेत, त्यांतून

१ अठरा. २ भयरहित. ३ रहा. ४ भयंकर प्राण्यांनीं.

प्रसिद्ध ते प्रसंगवशात् एथें सांगतों; ते हेः—**अभंग, दिंडी, साकी, ओंवी,** आणि **घनाक्षरी.**

## ६८ अभंग छंद.

अभंग मुख्यत्वें दोन प्रकारचे आहेत. एक मोठा अभंग आणि एक लहान अभंग. त्यांत मोठ्या अभंगाचे दोन प्रकार, आणि लहान अभंगाचे तीन प्रकार, असे सर्व मिळून अभंगाचे पांच प्रकार होतात. ते क्रमानें सांगतों.

### मोठा अभंग.

मोठ्या अभंगास चार चरण असतात, त्यांत पहिल्या तीन चरणांस प्रत्येकीं सहा सहा अक्षरें आणि चौथ्या चरणास चार अक्षरें असतात.

#### पहिला प्रकार.

दुसऱ्या आणि तिसऱ्या चरणांच्या शेवटीं यमक[1] असतें.

#### उदाहरण. अभंग तुकारामाचे.

काय वानूं आतां ॥ न पुरे ही वाणी ॥ मस्तक चरणीं ॥ ठेवियेलें ॥ १ ॥
थोरींव सांडिली ॥ आपुली परीसें ॥ धन्य केलें कैसें ॥ लोखंडासी ॥ २ ॥
जगाच्या कल्याणा ॥ संतांच्या विभूती ॥ देह कष्टविती ॥ उपकारें ॥ ३ ॥
भूतांची दया हें ॥ भांडवल संतां ॥ आपुल्या ममता ॥ देहीं नाहीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे सुख ॥ पराचिया सुखें ॥ अमृत हें मुखें ॥ स्रवतसे ॥ ५ ॥

#### दुसरा प्रकार.

पहिल्या, दुसऱ्या, आणि तिसऱ्या चरणांस यमक असतें.

#### उदाहरण. अभंग तुकारामाचे.

पंढरीस जावें ॥ जीवन्मुक्त व्हावें ॥ केशवा भेटावें ॥ जीवलगा ॥ १ ॥
जन हे सुखाचे ॥ दिल्या घेतल्याचे ॥ बा अंतकाळींचें ॥ नाहीं कोणी ॥ २ ॥

### लहान अभंग.

लहान अभंगास दोन चरण असतात. त्यांत प्रत्येक चरणास आठ आठ अक्षरें असतात. क्वचित् पहिल्या चरणास सहा अक्षरें असतात. दोन्ही चरणांस यमक असतें.

---

१ प्रास ( सारखीं अक्षरें. )

### पहिला प्रकार.

### उदाहरण. अभंग तुकाराम.

जरी व्हावा तुज देव ॥ तरी सुलभ उपाव ॥ १ ॥
करीं मस्तक ठेंगणा ॥ लागें संतांच्या चरणा ॥ २ ॥
भावें गावें गीत ॥ शुद्ध करोनियां चित्त ॥ ३ ॥
तुका ह्मणे फार ॥ थोडा करीं उपकार ॥ ४ ॥

### दुसरा प्रकार.

दुसऱ्या चरणाचीं सात अक्षरें असून चौथें यमकाक्षर असतें.

### उदाहरण. अभंग तुकाराम.

पुढें आतां कैचा जन्म ॥ ऐसा श्रम वारेसा ॥ १ ॥
पांडुरंगा ऐशी नाव ॥ तारि भाव असतां ॥ २ ॥

### तिसरा प्रकार.

ह्याला आठ आठ अक्षरांचे चार चरण असतात आणि पहिल्या तीन चरणांच्या शेवटीं यमक असतें.

### उदाहरण. अभंग तुकाराम.

देवा पायीं नाहीं भाव ॥ भक्ति वरी वरी वाव ॥ १ ॥
समर्पिला नाहीं जीव ॥ जाणावा हा व्यभिचार ॥ २ ॥

---

## ६९ दिंडी छंद.

दिंडीला चार चरण असतात, आणि चरणाच्या शेवटीं अनुप्रास किंवा यमक असतें. त्यांत तीं कोठें दोनदोन चरणांचीं सारखीं, कोठें चारी चरणांचीं सारखीं अशीं असतात. ह्या छंदास अक्षरांचा नियम नाहीं, पण मात्रांचा नियम आहे. प्रत्येक चरणास एकोणीस मात्रा असतात आणि नवव्या मात्रेवर अवसान असतें ह्मणून नऊ मात्रांचा एक व दहा मात्रांचा एक असे दोन भाग होतात. त्यांच्या मात्रांची रचना अशी असावी कीं, पहिल्या भागांत प्रथम तीन मात्रांचा एक गण, ह्मणजे एक गुरु, एक लघु; किंवा एक लघु, एक गुरु; किंवा तीनहि लघु असा असावा. त्यापुढें तीन गुरु; किंवा सहा लघु; किंवा लघु-

गुरु मिळून सहा मात्रांचा गण असावा. दुसऱ्या भागांत पहिल्याप्रमाणें प्रथम तीन मात्रांचा गण, मग पुन्हा तसाच आणखी तीन मात्रांचा गण, व त्यांच्यापुढें ह्मणजे शेवटीं दोन गुरु असावे.

### १ उदाहरण. दिंडी. रघुनाथ पं०.

कथा बोलूं हे मधुर सुधाधारा ॥ होय शृंगारा करुणरसा थारा ॥
निषधराजा नळनामधेय होता ॥ वीरसेनाचा तनय महा होता ॥ १ ॥

### २ उदाहरण. दिंडी. रघु० पं०.

चौगुणीनें जरि पूर्ण शीतभानू ॥ नळा ऐसा तरि कळानिधी मानूं ॥
प्रतापाचा जो न मावळे भानू ॥ तयासारीखा कोण दुजा वानूं ॥ २ ॥

---

## ७० साकी छंद.

प्रत्येक साकीला दोन चरण किंवा दोन अर्धें असतात; आणि दोहोंच्या शेवटीं यमक असतें. प्रत्येक अर्धांत चार मात्रांचा एक गण असे सात गण ह्मणजे अठ्ठावीस मात्रा असतात. चौथ्या गणाच्या अंतीं ह्मणजे सोळाव्या मात्रेवर अवसान असतें. पूर्वी मात्रावृत्तांत मात्रागण पांच प्रकारचे सांगितले आहेत, त्यांतून कोणतेहि गण असले तरी चिंता नाहीं; पण गण निरनिराळे मोजतां येतील असे असावे आणि शेवटीं गुरु अक्षर यावें.

### उदाहरण. साक्या. मोरोपंत.

श्रीरघुवंशीं ब्रह्मप्रार्थित, लक्ष्मीपति अवतरला ॥
विश्वसहित ज्याच्या जनकत्वें, कौसल्याधव तरला ॥ १ ॥
राबवि सिद्धिसि आश्रमिं जो तो, गाधिज मागुनि ने त्या ॥
शिकवि बलातिबला विद्या शत, अस्त्रें विधिच्या नेत्या ॥ २ ॥
जनकमखातें मुनिसह जातां, प्रभुनें गौतमभार्या ॥
उद्धरिली ती पतिसह पूजी, स्तवुनि अहल्या आर्या ॥ ३ ॥
यश करि भारि भवधनु भंगुनि, हर्षे सीता बाळा ॥
माळा घालुनि वरिती झाली, रामा त्रिजगत्पाळा ॥ ४ ॥

---

## ७१ ओंवी छंद.

ओंवीला चार चरण असतात. तीन चरणांच्या शेवटीं यमक असतें. चौथ्याला नसतें. पहिल्या तीन चरणांस आठ आठ अक्षरें आणि शेवटच्या चरणास सात अक्षरें असावीं, हा मुख्य नियम; परंतु शब्द व अर्थ ह्यांच्या अनुरोधानें कवि अधिक उणीं अक्षरें घालतात.

### उदाहरण. ओंवी. ज्ञानदेव.

जो सर्वां भूतांचे ठायीं ॥ द्वेषातें नेणेचि कांहीं ॥
आपपर जया नाहीं ॥ चैतन्या जैसें ॥ १ ॥

### उदाहरण. ओंवी. मुक्तेश्वर.

पौरववंशीं प्रख्यातकीर्ती ॥ दुष्यंतनामा गुणैकमूर्ती ॥
श्रेष्ठ भूपाळ चक्रवर्ती ॥ वीर्यें शौर्यें आगळा ॥ १ ॥

### उदाहरण. ओंवी. एकनाथ.

मस्तकींचे नीळ कुंतळ ॥ जेंवी नभ अति सुनीळ ॥
तळीं मुखचंद्र निर्मळ ॥ भीमकीचा उगवला ॥ १ ॥

### उदाहरण. ओंवी. श्रीधर.

यशोदा ह्मणे हे जगजेठी ॥ आतां कैची तुझी भेटी ॥
स्नेहें उमाळे उठती पोटीं ॥ स्तनीं पान्हा फुटलासे ॥ १ ॥

### उदाहरण. ओंवी. रामदास.

आतां वंदूं कवीश्वर ॥ जे शब्दसृष्टीचे ईश्वर ॥
नातरी हे परमेश्वर ॥ वंदावे ते ॥ १ ॥

---

## ७२ घनाक्षरी छंद.

घनाक्षरी छंद ओंवीप्रमाणें आहे; पण तशा चार मिळून एक घनाक्षरी होते; घनाक्षरीला सोळा चरण येतात; चार चरण मिळून तिचा पाद होतो; व प्रत्येक पादाच्या पोटचे चार चरण असतात. त्यांत पहिल्या तीन चरणांतच प्रत्येकीं आठ अक्षरें असून बारा मात्रा असा-

व्या, आणि चौथ्या चरणांत सात अक्षरें असून अकरा मात्रा असाव्या. असा प्रायः नियम असतो. प्रत्येक पादांत तीन तीन चरणांचीं यमकें आणि प्रत्येक पादाच्या चौथ्या चौथ्या चरणांचीं यमकें असावीं. ह्यास उदाहरणें.

### उदाहरण. घनाक्षरी वामनाची.

अहो कैकयी हें काय ॥ केलें तुवां हाय हाय ॥
न ह्मणवे तुज माय ॥ जन्मोजन्मीं वैरिणी ॥ १ ॥
सर्व जगदभिराम ॥ वना धाडिला तो राम ॥
केलें विख्यात कुनाम ॥ कीं हे पतिमारिणी ॥ २ ॥
तुझ्या वधें न अधर्म ॥ तुज मारावें हा धर्म ॥
परि निंदील हें कर्म ॥ राम पापकारिणी ॥ ३ ॥
नाहीं तरी प्राण आज्य ॥ तुझें घालोनियां प्राज्य ॥
जाळोनियां सामराज्य ॥ दाखवितों करणी ॥ ४ ॥

### उदाहरण. घनाक्षरी वामनाची.

ह्मणे भरत हा राम ॥ त्राहे त्राहे मेघश्याम ॥
वसिष्ठ हा गुरु नाम ॥ तोही मज कोपला ॥ १ ॥
अंतरले तुझे पाय ॥ तया राज्याचे उपाय ॥
सांगे मज हा हाय ॥ नव्हे गुरु आपला ॥ २ ॥
अग्नितुल्य वाटे राज्य ॥ मज जाळील साम्राज्य ॥
वरी ऋषि घाली आज्य ॥ त्यानें जीव तापला ॥ ३ ॥
दावीं सत्वर चरण ॥ किंवा स्वामी दे मरण ॥
तुझ्या नामाचें स्मरण ॥ त्याचा भव संपला ॥ ४ ॥

### उदाहरण. घनाक्षरी मोरोपंताची.

विश्वामित्र तपोधन ॥ त्याचें तोषवाया मन ॥
तृषितें तृषिता वन ॥ पीतां द्यावें ज्यापरी ॥ १ ॥
गुरूक्तें दशस्यंदन[1] ॥ रामलक्ष्मण नंदन ॥
अर्पी करूनि वंदन ॥ चित्तीं ह्मणे हा परी ॥ २ ॥

---

१ दशरथ राजा.

बळातिबळाख्या दोन ॥ विद्या दे गुण वदोन ॥
प्रवास राज्यपदोन[1] ॥ न वाटे त्याउपरी ॥ ३ ॥
प्रेमें अस्त्रशतदान ॥ दे रामास बहुमान ॥
गाधिज सत्कथापान ॥ करवी परोपरी ॥ ४ ॥

**उदाहरण. घनाक्षरी मोरोपंताची.**

मुनि गुरू ह्मणे हाण ॥ तोंचि सोडोनि सुबाण ॥
ताटकेचे हरी प्राण ॥ राम लावी न क्षण ॥ १ ॥
सिद्धाश्रमीं निशाचर[2] ॥ सुबाहु प्रमुख खर ॥
संहारी हाणोनि शर ॥ करी यज्ञरक्षण ॥ २ ॥
पुंख-वातें महाशूर ॥ मारीचा उडवी दूर ॥
दैवें नाहीं झाला चूर ॥ तो कीं तें विलक्षण ॥ ३ ॥
विश्वामित्र सभाजन ॥ करी स्तुतीस भाजन[3] ॥
सर्व ऋषि सभाजन ॥ झाले तेव्हां सक्षण[4] ॥ ४ ॥

ह्याशिवाय प्राकृत कवितेंत अनेक प्रकारच्या चालींचीं पदें, कटिबंध, चूर्णिका, इत्यादि प्रकार आहेत, ते सांगण्याची एथें आवश्यकता नाहीं ह्मणून सांगितले नाहींत. सवाई ह्मणून जो प्रकार आहे तो वृत्तांत धरण्यासारखा आहे ह्मणून तो मागें ( पृष्ठ ३३ पहा ) सांगितला आहे.

---

## उपसंहार.

**वसंततिलका.**

हें वृत्त-दर्पण अतज्ज्ञजनार्थ केलें ॥
सुज्ञांसमोर जरि धैर्य धरोनि नेलें ॥
ऐकोन हांसतिल रीति नवीच कानें ॥
हातीं तथापि धरितीलचि कौतुकानें ॥ १ ॥

---

१ राज्यपदाहून कमी. २ राक्षस. ३ पात्र. ४ सानंद (आनंदयुक्त).

## शार्दूलविक्रीडित.

एथें जें पडलें उणें अधिक तें विद्वज्जनीं साहिजे ॥
प्रेमें पूर्ण कृपा करोनि बरवें केलें तिहीं पाहिजे ॥
जे जे थोर परोपकार-रत त्यां हें योग्य आहे सदा ॥
त्यांचा तो उपकार फारच आह्मी मानूं सदासर्वदा ॥ २ ॥

## उपजाति.

धुंडोनियां वृत्त-सुधाकरातें ॥ जे लागले वृत्त-मणी करातें ॥
करोनि त्यांचीच सु-वृत्त-माला ॥ समर्पिली म्यां विबुधोत्तमांला ॥ ३ ॥

## आर्या.

हा ग्रंथ **गोडबोले** उपनामक **परशुरामतात्यानें** ॥
केला वाचायाला ज्याच्या हृदयांत रसिकता त्यानें ॥ ४ ॥

## अनुष्टुप्.

सत्राशें ब्यायशींच्या हा संपला रौद्रवत्सरीं ॥
श्रावणाच्या कृष्णपक्षीं दशमी भानुवासरीं ॥ ५ ॥

**समाप्त.**


SR